

# शिवजयंती - २०२० उरण प्लांट

**ओ.एन.जी.सी. स्थानीय लोकाधिकार समिती व ओ.एन.जी.सी. (WOU) कर्मचारी संघटना,उरण** यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबाद प्रमाणे दिनांक १२/०३/२०२० रोजी,फाल्गुन वद्य तृतीया (शके १५५१) तिथीनुसार हिंदुस्थानचे आराध्य दैवत,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे अढळ स्फूर्तीस्थान छत्रपती शिवाजी महाराज यांची **शिवजयंती** उरण प्लांटमध्ये तिथीप्रमाणे साजरी करण्यात आली.उरण प्लांटचे अधिकारी वर्ग श्री.बिस्वजित हलदर साहेब (GM - E & Tc.),श्री.गौरव पतंगे साहेब (Sr.Executive - HR- CSR) यांच्या हस्ते कर्मचारी संघटना कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या तसबीरीस पुष्पहार अर्पण करण्यात आला.तसेच याप्रसंगी उरण प्लांट मधील सन् २०१९ मध्ये नव्याने रुजू झालेल्या नवोदित कर्मचाऱ्यांकडून कर्मचारी संघटनेच्या कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा भेट देण्यात आला.या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण तसेच पुष्पहार अर्पण श्री.जॉर्ज केरकट्टा साहेब (GM - HR) व श्री.हेमंत पडते साहेब (माजी सचिव - कर्मचारी संघटना,उरण) यांच्या हस्ते करण्यात आले.उरण प्लांट चे प्रशासकीय कार्यालय असलेले द्रोणागिरी भवन येथे स्थापित छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्यास श्री.प्रवीण घरत साहेब (CM - HR) व श्री. गौरव पतंगे साहेब (Sr.Executive - HR) यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.शिवछत्रपतींच्या राज्यकारभार व नीतिशास्त्राची प्रेरणा घेऊन भारताची राज्यघटना लिहिणारे घटनाकार,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास श्री.डी.एस्.कांबळे साहेब (Chairman - AISCSTEWA) व जहीर अहमद साहेब (CM - HR) यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.उरण प्लांट चे मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या APU गेट वरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्यास श्री.जॉर्ज केरकट्टा साहेब (GM - HR),श्री.एस्.के. झा साहेब (GM - Electrical,I/c - Cogen.) व पी.एस.पायल साहेब (Assistant Commandant - CISF) यांच्या हस्ते शाल व पुष्पहार अर्पण करण्यात आला.तद्नंतर शेकडो शिवभक्तांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांची सुश्राव्य आरती करून,पेडे वाटप करण्यात आले.छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने,पोवाडे व शिवशौर्यगीताने परिसर दुमदुमून निघाला होता.सदर कार्यक्रमास सौ.नेहा साळुंखे मॅडम (Chairperson- WDF,Uran) व श्री.अरविंद घरत साहेब (सचिव - पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन,उरण) यांची विशेष उपस्थिती होती.कर्मचारी संघटनेचे सचिव श्री.रमेश नाईक व श्री.उज्जेश तुपे यांच्या मार्गदर्शनाने,श्री.मनोहर थळी,श्री.गौतम कदम,श्री.विश्वनाथ भागवत,श्री.हेमंत पडते व श्री.राजेंद्र माळी यांच्या विशेष सहकार्याने व कर्मचारी संघटनेच्या सभासदांच्या योगदानाने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.सदर कार्यक्रमास उपस्थित तमाम शिवप्रेमींचे मनःपूर्वक आभार!

|| जय जिजाऊ ||

|| जय शिवराय ||

|| जय शंभूराजे ||

|| जय जय शंभू रौद्र शंभू ||





**कर्मचारी संघटना कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या तसबीरीस पुष्पहार अर्पण करताना**

श्री.बिस्वजित हलदर साहेब (GM - E & Tc.),श्री.गौरव पतंगे साहेब (Sr.Executive - HR- CSR)






**कर्मचारी संघटना कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण तसेच पुष्पहार अर्पण करताना**

श्री.जॉर्ज केरकट्टा साहेब (GM - HR) व श्री.हेमंत पडते साहेब (माजी सचिव - कर्मचारी संघटना,उरण)



**उरण प्लांट चे प्रशासकीय कार्यालय असलेले द्रोणागिरी भवन येथे स्थापित छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना**

श्री.प्रवीण घरत साहेब (CM - HR) व श्री. गौरव पतंगे साहेब (Sr.Executive - HR)



**शिवछत्रपतींच्या राज्यकारभार व नीतिशास्त्राची प्रेरणा घेऊन भारताची राज्यघटना लिहिणारे घटनाकार,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना** श्री.डी.एस्.कांबळे साहेब (Chairman - AISCSTEWA) व जहीर अहमद साहेब (CM - HR).













**उरण प्लांट चे मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या APU गेट वरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्यास शाल व पुष्पहार अर्पण करताना** श्री.जॉर्ज केरकट्टा साहेब (GM - HR),श्री.एस्.के. झा साहेब (GM - Electrical,I/c - Cogen.) व पी.एस.पायल साहेब (Assistant Commandant - CISF)









**शेकडो शिवभक्तांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांची सुश्राव्य आरती करताना**





















